५० कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत नियोजन, अंमलबजावणी, संनियंत्रण आणि समन्वयन याकरिता शालेय शिक्षण व क्रीडा विभागांतर्गत "समन्वय अधिकारी" यांची नेमणूक करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
कार्यालयीन आदेश क्रमांकः संकीर्ण-१११७/प्र.क्र.३०५/एस.एम.१

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २६ ऑक्टोबर, २०१७

संदर्भ :

१) शासन परिपत्रक क्रमांकः क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.३६४/एस.एम.१, दि.१ मार्च, २०१७.
२) सचिव (वने), महसूल व वन विभाग, यांचे क्र.साववि-२०१७/प्र.क्र.१३८/फ-११, दि.४ ऑक्टोबर, २०१७ चे पत्र.

कार्यालयीन आदेश:

राज्याचे पर्यावरण समृध्द आणि सुरक्षित करण्यासाठी व वनक्षेत्र २० टक्क्यावरुन ३३ टक्क्यांपर्यंत वाढवत नेण्यासाठी महसूल व वन विभागामार्फत "हरित महाराष्ट्र" ही संकल्पना राबविण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून दि.१ जुलै, २०१६ रोजी २ कोटी वृक्षारोपणाचा कार्यक्रम शासनाने हाती घेतला होता. वृक्षारोपणाची गती तुटू न देता त्यात सातत्य रहावे, म्हणून सन २०१७ ते सन २०१९ या कालावधीत ५० कोटी वृक्ष लागवडीचा कार्यक्रम हाती घेण्यात आलेला आहे. त्यात सर्व प्रशासकीय विभागांचा समावेश करण्यात आला आहे. तसेच प्रत्येक विभागाला वृक्षारोपणाचे उद्दीष्ट ठरवून देण्यात आले आहे. शालेय शिक्षण व क्रिडा विभागास नेमून दिलेल्या उद्दिष्टाबाबत संदर्भ क्र.(१) येथील परिपत्रकान्वये आदेश देण्यात आले आहेत.

२. सन २०१६ मध्ये २ कोटी वृक्षारोपणाचे उद्दिष्ट असताना २.८३ कोटी वृक्षरोपण झाले तर सन २०१७ मध्ये ४ कोटी वृक्षारोपणाचे उद्दिष्ट असताना ५.४३ कोटी वृक्षारोपण झाले. यामध्ये शालेय शिक्षण विभागाच्या क्षेत्रिय अधिकारी/कर्मचारी आणि अनुदानित/विनाअनुदानित शाळा/संस्था व जिल्हा परिषद शाळांचा अत्यंत महत्वाचा सहभाग आहे. सन २०१८ व सन २०१९ मध्ये अनुक्रमे १३ कोटी आणि ३३ कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. त्यानुसार दिलेले लक्ष गाठणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी क्षेत्रिय अधिकारी/कर्मचारी यांना प्रोत्साहित करणे, त्यांना येणाऱ्या अडचणी दूर करणे आणि वृक्षांचे जिवंत राहण्याचे प्रमाण ८० ते ९० टक्के इतके राखण्यासाठी विविध उपाययोजना हाती घेणे, इ.बाबींचे मंत्रालय स्तरावरुन समन्वयन व संनियंत्रण होणे आवश्यक आहे. तरच हा कार्यक्रम उत्तमरित्या यशस्वी होण्यास हातभार लागेल.

३. याअनुषंगाने, "हरित महाराष्ट्र" या संकल्पनेअंतर्गत सन २०१७ ते सन २०१९ या कालावधीत ५० कोटी वृक्ष लागवडीच्या कार्यक्रमाचे मंत्रालय स्तरावरुन समन्वयन व संनियंत्रणाचे कामकाज पहाण्यासाठी प्रत्येक विभागांतर्गत समन्वयन अधिकाऱ्याची नियुक्ती करावयाची आहे. यासाठी शालेय शिक्षण विभागांतर्गत श्रीमती स्वा.म.नानल, उप सचिव (शा.व्य.), (कार्यालयीन दूरध्वनी क्र. २२०२४२३७, भ्रमणध्वनी क्र.९८६९४४१२९०) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२, यांची समन्वय अधिकारी म्हणून नेमणुक करण्यात येत आहे.

४. सर्व शिक्षण संचालक व सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक यांना याव्दारे कळविण्यात येते की, त्यांनी सदर कार्यक्रमाची माहिती क्षेत्रिय अधिकारी/ कर्मचारी, सर्व शैक्षणिक संस्था/ शाळा तसेच जिल्हा परिषद शाळांच्या निदर्शनास आणून वृक्ष लागवडीच्या उद्दीष्ट पूर्ततेसाठी त्यांना सक्रीय सहभागी करून घ्यावे.

सदर कार्यालयीन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१०२७१२१८११६६२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Swati Madhukar
Nanal

Digitally signed by Swati Madhukar Nanal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=82e1d6f07c5cabf5884958ee70015d36b35b2c07e9700fe62cba2439a81b4be4, serialNumber=007d84f8ce44beba86b0ca2d0155d67cc1a9db4f8d59bc9d8067628d62bcdc1a, cn=Swati Madhukar Nanal
Date: 2017.10.27 12:08:39 +05'30'

(स्वा.म.नानल)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. प्रधान सचिव (शा.शि.) यांचे स्वीय सहाय्यक, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२. सचिव (वने) यांचे स्वीय सहाय्यक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
३. आयुक्त, शिक्षण व अधिनस्त संचालक कार्यालये, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.
४. आयुक्त, (क्रिडा व युवक सेवा), महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, पुणे.
६. संचालक (क्रिडा व युवक सेवा), महाराष्ट्र राज्य,पुणे.
७. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
८. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
९. शिक्षण संचालक (प्राथमिक/ माध्यमिक व उच्च माध्यमिक/प्रौढ शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०. संचालक, महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद, पुणे.
११. संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक, संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.
१२. संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती), पुणे.
१३. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे.
१४. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
१५. सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/ माध्यमिक), जिल्हा परिषद,
१६. शिक्षण निरिक्षक (उत्तर /दक्षिण/ पश्चिम), मुंबई.

प्रत :

१७. मा.मंत्री (वित्त,नियोजन व वने) यांचे खाजगी सचिव,

१८. मा.मंत्री (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहाय्यक,

१९ सह सचिव (प्रशासन), शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई.

२०. उप सचिव/अवर सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,मंत्रालय, मुंबई.

२१. कक्ष अधिकारी (फ-११), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

२२. निवडनस्ती-एस.एम.१ संग्रहार्थ.